**मनातील अंतिम विचार ठरतो भावी जन्माची नांदी–**

मृत्यूशय्येवरील अंतिम विचार मानवाची भावी जन्मातील नियती ठरविण्यात महत्वपूर्ण ठरू शकतात. हे अंतिम विचार भावी जीवनातील नांदी ठरू शकतात. भगवदगीतेत भगवान कृष्ण म्हणतात –''देहाचा त्याग करताना, तुम्ही जो विचार करता तेच तुम्हाला मिळेल. तीच अवस्था तुम्हाला प्राप्त होते.''(अध्याय ८ – श्लोक ६)

अजामळाने चांगली वागणूक सोडून, अस्थिर जीवन जगायला सुरूवात केली. त्याला पाप करण्याची सवय लागली, परिणाम स्वरूप तो चोऱ्या करायला लागला, डाके घालू लागला. त्याला दहा मुले होती आणि शेवटच्याचे नाव नारायण होते.

तो मृत्यूशय्येवर असताना त्याच्या मनात सतत सर्वात लहान मुलाचे विचार घोळत होते. मृत्यूदूत अजामळाकडे येत असताना, त्याने आर्तपणे ''नारायणा'' अशी हाक घातली. एवढे नाव ऐकूनच हरीचे सेवक धावत आले आणि त्यांनी मृत्यूदूतांना हाकलून लावले. अजामळाला घेऊन ते सरळ वैकुंठाला गेले.

शिशूपालाचा आत्मा क्षणार्धात परमेश्वरामध्ये विलीन झाला आणि त्याला दिव्यत्व प्राप्त झाले. याच शिशूपालाने जन्मभर भगवान श्रीकृष्णाला विरोध केला होता पण अंती तो भगवंतामध्येच सामावला.

भिंतीवरील किड्याला गांधीलमाशीने डंख मारला की किडाही गांधीलमाशीसारखा दिसू लागतो. तद्वत भगवंताचा द्वेष करणाऱ्या माणसांची पापे नष्ट होऊन ती



अंततः भगवंतामध्ये विलीन होतात. गोपींनी आत्यंतिक प्रेमाचा मार्ग अवलंबिला, कामसा भीतीपोटी भगवंतापुढे झुकली, शिशूपाल द्वेषाने तर नारदाने भक्तीने ईश्वरप्राप्ती करून घेतली.

गीतेमध्ये भगवंत म्हणतात ''जो सातत्याने आणि एकाग्रपणे माझे ध्यान करतो, योग्याप्रमाणे वर्तन करतो, तो मला सहजपणे हस्तगत करू शकतो. अशा प्रकारे माझ्याजवळ आल्यानंतर त्या व्यक्तीला या दुःखद आणि वेदनामयी जगात पुन्हा जन्म घ्यावा लागत नाही. अर्जुना, ब्रह्मदेवाने निर्मिलेल्या या जगाला वेळेचे आणि गतीचे बंधन असले तरीही माझ्यापर्यंत पोहोचलेल्या व्यक्तिला पुर्नजन्म नसतो. माझे ध्यान कर, मन आणि बुद्धी माझ्यावर केंद्रित कर, तू मला प्राप्त करशील.''(अध्याय ८ – श्लोक १४,१५, १६)

आसपासच्या भौतिक सुखांच्या पाठलागामध्ये सदैव रममाण झालेल्या माणसाने जर देवावर लक्ष केंद्रित केले तर, निर्याणाच्यावेळीही आपोआप त्याच्या मनात फक्त ईश्वराचेच विचार येतील. भगवंत म्हणतात – ''अशाप्रकारे सतत योगसाधना केल्यावर कोठल्याही ऐहिक गोष्टींनी विचलित न झाल्यावर माणसाला अंतिम आणि सर्वोच्च पदाची प्राप्ती होते आणि त्याच्या दिव्य तेजाने ती व्यक्ती झळाळून जाते.''

भगवंत पुढे म्हणतात – ''अंतिम समयी जो माझा (नारायणाचा) विचार करतो, तो देहत्यागानंतर माझ्यात विलीन होतो. यावर विश्वास ठेवा. मृत्यूसमयी व्यक्ती ज्या रूपात माझे चिंतन करते, ते रूप तिला प्राप्त होते.''

भगवंत प्रतिपादन करतात ''माझ्यामध्ये चित्त स्थिर केलेल्या व्यक्तिला, अंतसमयी सर्व गोष्टींचा त्याग करताना आपोआपच संभ्रमांपासून मुक्ती मिळते.''(अध्याय –२)



तपकीर ओढण्याची सवय असलेली व्यक्ती, अत्यवस्थ आणि बेशुद्ध अवस्थेतही बोटांनी तपकीर ओढल्याची कृती करते, इतकी ही सवय प्रबळ झालेली असते.

लंपट पुरूषाच्या मनातील शेवटचा विचारही त्याच्या स्त्रीबद्दलचा असतो. अट्टल दारूडी व्यक्ती शेवटच्या क्षणापर्यंत फक्त दारूचाच विचार करीत असते. लोभी सावकार मरेपर्यंत फक्त पैसा–पैसा करीत असतो.

युद्धसम्मुख शिपाई मरेपर्यंत दुश्मनाचा खातमा करण्याचाच विचार करीत असतो. मुलावर आत्यंतिक प्रेम करणारी आई, शेवटच्या क्षणी फक्त तिच्या मुलालाच आठवत असते. भरत राजाने प्रेमापोटी एक हरीण पाळले आणि तो त्या हरीणामध्येच गुंतून पडला. त्याचा पुनर्जन्मही हरीणाचाच होता. मात्र प्रगल्भ आत्मा असल्याने त्याला मागील जन्मातील घटना आठवत होत्या.

आयुष्यभर भगवंताचे ध्यान करण्याची शिस्त मनाला लावून घेतली तर आपोआप अंतसमयी भगवंताचीच प्रतिमा तुमच्या चक्षूंसमोर येईल. मात्र हे एक दोन दिवसांमध्ये होणे शक्य नाही. त्यासाठी जीवनभराची साधना हवी.

शेवटचा विचार, भावी जन्म ठरवतो. असा प्रखर विचार मृत्यूसमयी मन व्यापून टाकतो. दैनंदिन जीवनात व्यापून टाकणाऱ्या गोष्टीच बहुधा मृत्यूसमयी प्रामुख्याने मनात येत असतात. शेवटचे विचारच, भावी जीवनातील, त्या व्यक्तीचे चारीत्र्य ठरवितात. जसा तुम्ही विचार कराल, तसेच होईल.

–स्वामी शिवानंद

(भावानुवाद – डॉ. नितीन देशपांडे)

**Thoughts of Saints:-**

- God says- "What you wish and long for with all your heart, that is yours ! If you ask for me, I am yours!!
- There is misery, there is suffering everywhere. You must face all difficulties with a cheer. You must be bold to undergo them. You must overcome them slowly. You will have to wait patiently for the Lord's blessings. Take courage from within. Stand the trial for some time and become victorious.
- Man is searching throughout the world for satisfaction through created objects but in spite of his lifelong searching, he fails to find happiness. He can obtain that satisfaction and fullness only in God.
- The spiritual path is an unknown path which is as straight and narrow as a razor. On it there is no other light than that of faith and Divine grace to guide the aspirant. There is no other sustenance than devotion.
- If you want to have peace, bear no ill-will towards anyone. In whatever manner the other person may behave, you should always be friendly and loving towards all.



## दिव्य जीवन संघ, पुणे शाखा वृत्तांत

✲ जानेवारी २०१८ महिन्याचा सत्संग, मकरसंक्रांतीच्या शुभदिवशी(१४ जानेवारीला) श्री. नितीन देशपांडे यांच्या निवासस्थानी संपन्न झाला. यावेळी पुणे शाखेचे अध्यक्ष श्री. भ.रा.नाईक यांनी संक्रमण पर्वाचे महत्व विशद केले.

✲ ''दिव्य जीवन'' या मासिक पत्रिकेचा अंक परिवारातील सदस्यांना वितरीत करण्यात आला.

### पुणे शाखेचा पत्ता

श्री. गो. आ. नगरकर
'स्वानंद एस् २०,
सहजीवन सोसायटी,
पर्वती, पुणे ४११००९
मो. ९३७०५७०२०६

श्री.नितीन देशपांडे
'ईशावास्य'
प्लॉट नं. ४९/सायंतारा,
डी.एस.के. विश्व, धायरी,
पुणे ४११०४१
मो.नं. ९८५०९३१४१७
९८५०८२६९९०

बुक पोस्ट

प्रति





# दिव्य जीवन



वर्ष १३/अंक २
फेब्रुवारी २०१८

**INTROSPECTION ENHANCES QUALITY OF SPIRITUAL LIFE BOTH SUBJECTIVELY AND OBJECTIVELY**

Through the processes of self analysis and self correction, you will be able to move slowly but steadily from your present state of being into ever progressive, ever better state of spirituality and aspiration, improving and rendering more spiritual, more dharmic, more daivi or divine, your thoughts, sentiments, attitudes towards others, behaviour towards others and your relationships with the entire world around you.

Let our life be a journey of steadily improving and enhancing the spiritual and divine quality of not only your subjective thoughts, feelings and sentiments , but also objectively - in the field of your relationship with the world around you and in the field of your relationship with other people who are similarly present in that setup so that your presence becomes a plus and positive factor in the field of your outer life as well as becoming a positive factor in terms of your own spiritual life and evolution.

**- Sri Swami Chidananda**